सांगवी पोलीस स्टेशन
पोलीस आयुक्तालय पिंपरीचिंचवड
पत्ता - साई चौक, नवी सांगवी, पुणे
संपर्कक्र. ८५३०३९७८३२.

प्रेसनोट ०१/०३/२०२४

**सांगवी पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी**

**सांगवी भागात एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ विक्रीसाठी जवळ बाळगलेल्या आरोपीस सांगवी पोलीसांकडुन अटक आरोपीकडुन २,०२,००,०००/- रु किंमतीचे ०२ किलो ३८ ग्रॅम एम.डी. (मेफेड्रॉन) जप्त**

---

दि. ०१/०३/२०२४ रोजी नारायण पाटील, सहा.पोलीस निरीक्षक, सांगवी पोलीस स्टेशन हे रात्रगस्त दरम्यान घरफोडी, चोरीस प्रतिबंध करण्याचे अनुषंगाने पिंपळे निलख भागात पेट्रोलिंग करीत असताना रक्षक चौकाचे पुढील बाजुस डी.पी. रोड पिंपळे निलख येथे पहाटे ०४/३० वा चे सुमारास आले असता हातामध्ये पांढऱ्या रंगाची पिशवी असलेला एक इसम त्यांचेकडील सरकारी गाडी पाहुन घाईघाईने निघुन जावु लागला. सदर इसमाचा त्यांना संशय आलेने, त्यांनी सोबतचा स्टाफ पोहवा १५३५ मोरे व पो.कॉ. २८७३ कांबळे यांचे मदतीने सदर इसमास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारला. त्याने त्याचे नाव नमामी शंकर झा, वय ३२ वर्षे, रा.संजय पाटील यांचे खोलीत, सेक्टर नं. २७, भेल चौक, निगडी पुणे मुळ गाव - मेहनात पैवती, ता. महीनाम, जि. दरभंगा, राज्य - बिहार असे सांगितले. त्याचे हातातील पिशवीबाबत विचारपुस केली असता तो उडवा उडवीची उत्तरे देवु लागला, त्यानंतर त्याचेकडे अधिक चौकशी केली असता, त्याने सदर पिशवीमध्ये एम.डी. हा अंमली पदार्थ असलेचे सांगितलेने सपोनि नारायण पाटील यांनी तपास पथकातील स्टाफ व दोन पंच बोलावुन घेतले. सदर इसमाचे ताब्यातील पिशवीची झडती घेतली असता त्याचे ताब्यात २,०२,००,०००/- रु किंमतीचा ०२ किलो ३८ ग्रॅम एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ तसेच १०,०००/- रु किं.चा मोबाईल फोन मिळुन आल्याने ते जप्त करण्यात आले असुन त्याबाबत सांगवी पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. ७५/२०२४, एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २१(क), २२(क)अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर आरोपीस अटक करण्यात आली असुन पुढील तपास चालु आहे. आरोपीतास आज रोजी मा. न्यायालयात हजर केले असता त्याची ०७ दिवस पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी माननीय श्री विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त पिं.चिं. , श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त., श्री संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त गुन्हे पिं.चिं., श्रीमती स्वप्ना गोरे , पोलीस उपआयुक्त परिमंडळ १ पिंपरी - चिंचवड., श्री शिवाजी पवार, पोलीस उप आयुक्त परिमंडळ - ३ पिं.चिं., डॉ. श्री विशाल हिरे, सहा.पोलीस आयुक्त, चिंचवड विभाग पिंपरी - चिंचवड., यांचे मार्गदर्शनाखाली सांगवी पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक. श्री रामचंद्र घाडगे, श्री वैभव शिंगारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा पिं.चिं., सहा.पोलीस निरीक्षक नारायण पाटील, पोलीस उप निरीक्षक नवनाथ चापाले, पोलीस अंमलदार पोहवा ७३९ शिंदे, पोहवा ११९४ गायकवाड, पोहवा १५३५ मोरे, पोहवा १५१२ गोडे, पोना १५३४ पाटील, पो.कॉ. २२१८ खंडागळे; पो.कॉ. २०११ पाटील, पो.कॉ. २२०९ डंगारे, पो.कॉ.३२८० शिंगोटे, पो.कॉ. ३३१४ माने, पो.कॉ ३३८८ लेकुरवाळे यांचे पथकाने केली.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त परि-१
पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner